# व्यवस्थापनाचा महामन्त्र ‘महंते महंत करावे’

**- डॉ. अश्विन भागवत, उज्जैन**

श्रीसमर्थ रामदास स्वामी म्हणजे भारताच्या पुरातन संत-परम्परेतील एक दैदीप्यमान दीप- स्तंभ होय, जे आपल्या वाङ्मयाच्या आणि विचार-परम्परेच्या माध्यमाने केवळ आध्यात्मिकच नव्हे तर प्रापंचिक मार्गाच्या वाटसरूंचेही मार्गदर्शन करीत आहे. समर्थांनी केलेला पारमार्थिक उपदेश प्रापंचिकांना तत्त्वज्ञानाचा बोध करवून त्यांना साधना करण्यासाठी प्रेरित करतो तर त्यांचे व्यक्तिमत्त्व व कार्य त्यांनी घडविलेल्या निर्भय, सदाचारी, संघटित आणि सामर्थ्यसम्पन्न समाजाची ऑळख पटवून जनसामान्याला आळस त्यागून प्रयत्न करण्यासाठी प्रवृत्त करते.

वयाच्या आठव्यावर्षी त्यांच्या मुखातून निघालेले उद्‌गार **‘चिन्ता करितो विश्वाची’** काही साधारण नव्हेंत. **चिन्ता म्हणजे काय ?** आणि **विश्वाची चिन्ता आपण कां करावीं** हे एवढ्याश्या मुलाला उमगले तरी कसे ? पण सृष्टी-व्यापाराकडे लक्ष देतां, हे शक्य आहे. जसे ब्रह्म-वृन्दाच्या अहंकाराचे निरसन करण्यासाठी एक बारा वर्षाचा मुलगा रेड्याच्या मुखातून वेद-मन्त्र वदवितो आणि ब्रह्म-तत्त्वाचे आबाल-सुलभ लोकभाषेंत प्रतिपादन करून ब्रह्म विद्येचा मार्ग सर्व-साधारणांसाठी मोकळा करतो.

समर्थांनी केवळ बाळपणातच नव्हे तर आयुष्यभर या विश्वाची चिन्ता केली आणि पुढे त्यांची व्यग्रता एवढी वाढली की **‘चिन्तेने ऊर फाटतो’** म्हणून इस्लामिक दहशतवादाचा सामना करण्यासाठी त्यांनी केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतभरांत अनेक श्रीराम व मारूती मन्दिरे आणि जवळ-जवळ ११०० मठांचे जाळे विणले. समर्थ स्थापित हे मठ केवळ पूजा-पाठ व जप-तप करण्याची स्थाने नव्हती. ही स्थाने **तेजस्वी संस्कारकेन्द्रें** होती. ज्ञान, सदाचार आणि भक्तिभावाच्या संस्कारांसह पुरूषार्थाचे आणि बलोपासनेचे संस्कार येथे जन-सामान्यावर घडविले जात असत. **‘आधी मेळवी मग जेवीं’** हा निर्देश देउन समर्थांनी परम्परागत भिक्षा-पद्धतिच्या माध्यमाने ह्या मठांना स्वावलम्बी व समाजाभिमुख ठेवले होते. समर्थांनी मठपतिंना दिलेल्या दिशा-निर्देशांवरून कळून येते की ह्या मठांमध्ये परस्पर-सम्पर्क-श्रृंखलाही होती व त्याचा उपयोग छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य-स्थापनेच्या कार्यासाठी आवश्यक तेव्हां, अनुकूल तसा होत गेला. स्वराज्यासाठी अनुकूल व पोषक जनमानस ह्या मठ-मन्दिरांच्या माध्यमातून घडविली गेली जेणेकरून विजयाची आकांक्षा जनमानसांत निर्माण झाली आणि स्वराज्याचा उषःकाल बघण्याचे भाग्य लाभले.

व्यवस्थापन हे कुठल्याही संस्थेचे वा संघटनेचे महत्त्वपूर्ण अंग आहे. योग्य व्यवस्थापन असल्यास एखादी संघटना त्वरीत आकाशाकडे झेप घेते. व्यवस्थापन ह्या विषयाकडे मागल्या काही दशकांपासूनच औद्योगिकांचे लक्ष वेधले गेले आणि त्यासाठी त्यांनी पाश्चात्य **‘मैनेजमेंट गुरूंकडे’** धाव घेतली. खरे बघितले तर व्यवस्थापन हे आपल्या प्रदीर्घ शास्त्र-परम्परेतील एक शास्त्र आहे आणि आपल्या प्राचीन शासन पद्धति मध्ये एखाद्या शासकाच्या दरबारांतील राजगुरूंचे स्थान आजच्या मैनेजमेन्ट गुरूपैक्षा शतपटीने अधिक महत्वाचे होते. महर्षि वशिष्ठ, भगवान कृष्ण, महर्षि पतंजली, विद्यारण्य मुनि, आर्य चाणक्य, समर्थ रामदास ह्या गुरूंनी आपल्या शिष्यांच्या केवळ आध्यात्मिक विकासाकडेच नव्हे तर त्यांच्या साम्राज्य-उभारणी आणि साम्राज्य- विस्तारामध्येही जातीने लक्ष घातले होते.

समर्थांच्या व्यवस्थापन-कौशल्याचा छत्रपती शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य संस्थापनेमध्ये सिंहाचा वाटा होता. समर्थांनी आपल्या भारत-भ्रमंतीत केलेल्या अभ्यासावरून हे हेरले की समाजाकडे सर्वकाही असले तरी ते आत्मकेन्द्रित असल्यामुळे त्यांच्यांत स्वतःपुरते पाहण्याची वृत्ती फार प्रभावी झाली आहे. स्वार्थामुळे त्यांच्यांत संघटन नाही, संघटित नसल्यामुळे शक्ति नाही आणि शक्ति नसल्यामूळे साहस आणि प्रतिकार करण्याची क्षमता दोन्हीं उत्पन्न होत नाही म्हणून त्यांना मुकाट्याने अत्याचार सहन करण्याखेरीच काहीच गत्यंतर नाही. **'अखंड चाळणा'** करणाऱ्या समर्थांनी ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून ठायी-ठायी प्रभू रामचन्द्राच्या आणि हनुमन्ताच्या मन्दिरांची स्थापना, मठांची उभारणी, लोकसंग्रह, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, महंतांची निवड व नेमणुक आणि मठांचा विस्तार करून **'शुन्यातून ब्रह्मांड'** हे वचन सार्थक करून दाखविले.

समर्थ वाङ्मयांत मुख्यत्वे दासबोधांत व्यवस्थापनाची सूत्रे ठायी-ठायी विखुरलेली आहेत. त्यांच्या व्यवस्थापन-सूत्रांतील महत्त्वाचे सूत्र आहे **'महंते महंत करावे'** ह्या सूत्राच्या आधारानेच त्यांनी सम्पूर्ण भारतभरांत ११०० मठांचे जाळे विणले. समर्थांनी भारतभ्रमण केले, योग्य माणसे पारखून निवडली आणि त्यांचा योग्य कार्यासाठी उपयोग करून घेतला हे जरी खरे असले तरी हे ही तितकेच खरे आहे की ह्या सर्व ११०० मठांची स्थापना काही समर्थांनी स्वतः केली नव्हती. त्यांनी आपल्या महंतांना **'महंते महंत करावे'** असा दिशा-निर्देश देऊन त्यांच्या माध्यमाने हे महद्कार्य करवून घेतले.

दासबोधातील निस्पृहवर्तणुकनावक समासांत समर्थ आपल्या लोकनेत्यासाठी, आपल्या महंतासाठी हा दिशा-निर्देश देतांत -

**महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे ।**
**जाणते करूनी विखरावे । नाना देसीं ॥ ११-१०-२५ ॥**

वरील दिशा-निर्देशाची एक-एक ऑळच नव्हें तर एक-एक शब्द मोलाचा आहे. हे सूत्र जर आपण आत्मसांत केले तर आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास आपो-आप होईल आणि पुढील प्रगतीचा मार्ग प्रशस्त होईल. वरील सूत्राच्या आधाराने एखाद्या औद्योगिकाला आपल्या लघु उद्योगाला देखील सहजपणे जागतिक स्तरावर नेता येईल.

**'महंते महंत करावे'** ही ऑळ म्हणजे नेतृत्त्व विकासाचा महामंत्र आहे. नेत्याने किंवा एखाद्या औद्योगिक संघटनेतील प्रबंधकाने आपल्या पदावर नियुक्त झाल्यावर नुसते हातावर हात ठेऊन बसल्याने किंवा **'सांगकाम्या'** सारखे केवळ आपल्याला दिलेली कामे (Asignments) आटोपणे हे विहीत नव्हे तर त्याने आपल्या सहकार्यांपैकी योग्य माणसांची निवड करून त्यांच्या नेतृत्व- क्षमतेच्या विकासांत सहभागी होणे अभिप्रेत आहे. ह्याच्यांत आपला सहकारी आपली जागा घेईल ही भीती बाळगणे म्हणजे आपल्या कर्तृत्वावर विश्वास नसण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे वरच्या पायरीवर पाय ठेवण्यासाठी खालच्या पायरीवरून पाय उचलावाच लागतो त्याखेरीज वर चढ़णे शक्य होत नाही, त्याचप्रमाणे वरचे पद प्राप्त करण्यासाठी चातुर्याच्या आणि कर्तृत्त्वाच्याबळावर आपल्या सहकाऱ्यांकडून योग्यतेने काम करवून घेणे आवश्यक आहे. असे केल्यानेच त्याला आपले **प्रबंधकीय-कौशल्य (Managerial Ability)** सिद्ध करता येईल आणि त्याच्या प्रगतीचा मार्ग आपो-आप खुला होईल.

महंताने म्हणजे नेत्याने किंवा प्रबंधकाने आपल्या सहकाऱ्यांमध्ये **कार्य कसे वाटावे** म्हणजे **'Work-Distribution'** कसे करावे ह्याबद्दल समर्थ म्हणतांत –

**लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।**
**जाणजाणोन धरावे । जवळी दुरी ॥ ११-१०-२१ ॥**

**अधिकारपरत्वें कार्य होतें । अधिकार नसतां वेर्थ जातें ।**
**जाणोनी शोधावीं चित्ते । नाना प्रकारें ॥ ११-१०-२२ ॥**

**अधिकार पाहोन कार्य सांगणे । साक्षेप पाहोन विश्वास धरणें ।**
**आपला मगज राखणें । काहीं तरी ॥ ११-१०-२३ ॥**

स्पष्ट आहे की नेत्याने आपले पुढचे नेते तयार करण्यासाठी अनेक लोकांना पारखून, त्यांचा अधिकार म्हणजे त्यांची कार्य क्षमता व दक्षता जाणून घ्यावी आणि त्यांना त्यांच्या लायकीप्रमाणे कामे वाटावी. योग्यता नसताना एखादे काम त्यांना दिले तर ते पूर्ण तर होतच नाही शिवाय आपला वेळही वाया जातो आणि नंतर ते कार्य आपल्याला स्वतःलाच करावे लागते. एक अतिशय महत्त्वाची सूचना समर्थांनी वरील ओवीत दिली आहे **'साक्षेप पाहोन विश्वास धरणे'** अर्थात् एखाद्या माणसाची पारखकरून जर आपण त्याला काही काम दिले तर तो दिलेले काम योग्यतेने करेल असा विश्वास काम पूर्ण होई पर्यंत त्याच्यावर ठेवावा आणि त्याच्या कामांत दखल देऊ नये. असे केल्याने तो स्वतन्त्रपणे ते कार्य पूर्ण करू शकेल आणि काम योग्यतेने करवून घेतल्यामुळे आपलेही महत्त्व आपो-आप वाढेल.

पुढचे नेते तैयार करण्यासाठी माणसांची पारख करून त्यांच्यातून योग्य माणसाना निवडल्यावर त्यांना **'युक्तिबुद्धीनें भरावें'** असा निर्देश समर्थ देतांत. ह्या निर्देशांत तीन शब्द आले आहेत- **'युक्ति'**, **'बुद्धी'** आणि **'भरावें'**. हे तीनही शब्द व्यवस्थापनाच्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाची आहेत. **'युक्ति''** चा अर्थ आहे **'रणनिती'** (Stretegy), **'बुद्धीचा'** अर्थ आहे **'कौशल्य'** (Ability) आणि **'भरावें'** चा अर्थ आहे **'प्रेरित करणें'** (Motivation). तात्पर्य आहे की निवडलेल्या माणसांना आपल्या व्यवसायाची रणनिती नीट समजावून त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण देऊन त्यांच्यांत व्यवसायासम्बन्धी योग्यता निर्माण करून त्यांना स्वतन्त्रपणे कार्य करण्यासाठी प्रेरित करणे हे नेत्याचे किंवा प्रबन्धकाचे महत्त्वपूर्ण कार्य आहे.

**'जाणते करूनी विखरावें । नाना देसीं'** ह्या ओळींचे तात्पर्य आहे - योग्य, कर्मठ आणि कार्यासाठी प्रेरित असलेल्या निवडक व्यक्तिंना **'जाणते करून'** म्हणजे स्वतन्त्रपणे कार्य करण्यासाठी आवश्यक दिशा-निर्देश देऊन त्यांना **'नाना देसीं विखरावें'** म्हणजे आपल्या उद्योगाच्या नवीन शाखा उघडून तेथे त्यांची नेमणूक करून नवीन शाखांचे स्वतन्त्र दायित्व त्यांना द्यावे आणि त्यांच्याकडून उत्तम कार्य करवून घेऊन आपल्या कार्याचा विस्तार करावा.

वरील सूत्राच्या आधारावर समर्थांनी अत्यन्त प्रतिकूल परिस्थितिमध्ये भारतभरांत ११०० मठांचे जाळे विणले. ज्याकाळी आजच्या प्रमाणे संचार साधने, वाहतुक, संगणके आदि नव्हती आणि **‘अस्मानी-सुल्तानी’** प्रकोपाची लाट भारताला गिळू पहात होती, त्याकाळी समर्थांनी सम्पूर्ण भारताला एका सूत्रांत ऒवले आणि **‘याचि देही’** हिन्दवी स्वराज्याच्या **‘आनन्दभुवनाचे’** स्वप्न साकारले.

समर्थांचे चरित्र म्हणजे स्वतः व्यवस्थापन-शास्त्राचा एक महान ग्रन्थ आहे. समर्थ वाङ्मयांत चरित्रांत व्यवस्थापन शास्त्राची बरीच सूत्रे सर्वत्र विखुरलेली आहेत. ह्या सूत्रांच्या आधाराने व्यवस्थापनावर एक मोठा प्रबन्ध निर्माण करता येईल कारण समर्थांचे उद्‌गार हे **‘प्रचितीचे बोलणे’** आहे आणि त्यांनी **‘आधी केलें मग सांगितले’** म्हणून ते स्वतःसिद्ध आहे.

**पाहतां पाहतां अनुमानलें । कळतां कळतां कळों आलें ।**
**पाहतां अवघेंचि निवांत जालें । बोलणें आतां ।।१२-५-२२।।**

वरील ओव्यांच्या माध्यमाने समर्थ स्मरण करून मी आपल्या लेखणीला विराम देतो .

**।। जय जय रघुवीर समर्थ ।।**

- डॉ. अश्विन भागवत
४ विद्या नगर,
सांवेर मार्ग,
उज्जैन -४५६०१० (म.प्र.)
भ्रमणध्वनि : ९८२६० २४१३७
ई मेल : bhagwatashvin@gmail.com